सकाळ

# 'रवळनाथ'चा ४०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण : चौगुले

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने ४०० कोटी ठेव संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण केले. ३१ जुलैअखेर ४०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण करण्याचा संकल्प संस्थेने सोडला होता. त्याची पूर्तता मुदतीपूर्वीच झाली, अशी माहिती संस्थेचे संस्थापक एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, ''संस्थेच्या विविध ठेव योजनांना ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला. मागता क्षणी पैसे परत मिळण्याची खात्री असल्याने ठेवीदारांची पसंती रवळनाथला मिळत आहे. सर्वसामान्य नागरिकांसह ज्येष्ठ, महिला, आजीव माजी सैनिक, अतिज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक व्याजदराची योजना १ जुलैपासून सुरू केली आहे. संस्थेतर्फे घरबांधणी कर्ज, फ्लॅट, प्लॉट खरेदी, सोनेतारण, शैक्षणिक, गृहोपयोगी उपकरण खरेदी आदींसाठी कर्ज सुविधा आहे. महिला व आजी-माजी सैनिकांना अर्धा टक्का सवलतीच्या व्याजदराने घरबांधणीसाठी कर्ज पुरवठा केला जातो.



संस्थेच्या अर्थसहाय्यातून आजपर्यत ३४०० घरे उभारली असून, त्यातील ३०० हून अधिक घरे सैन्यातील जवान व पोलिसांची आहेत. सर्व शाखेत आरटीजीएस, एनईएफटी, मोबाईल बँकिंग, मायक्रो एटीएम, डेबिट कार्ड, क्युआर कोड, लॉकर, वीज बिल भरण्याची सुविधा आहे. कोअर बँकिंग प्रणालीद्वारे सर्व शाखा एकमेकांना जोडल्या आहेत. यामुळे सभासद व ग्राहकांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करण्याची सोय आहे.

संस्थेचे महाराष्ट्र, कर्नाटक व दिल्ली कार्यक्षेत्र आहे. अकरा शाखांमध्ये ठेवींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ३१ जुलैअखेर ४०० कोटी ८७ लाखांच्या ठेवी जमा आहेत. २८१ कोटी २ लाखांची कर्जे वितरित केली आहेत. २८ कोटी २० लाखांचा स्वनिधी असून, ठेवींच्या ३३ टक्के १४८ कोटी १४ लाखांच्या ठेवी सुरक्षित असणाऱ्या विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकेत गुंतवणूक केली असल्याने ठेवीदारांना मागता क्षणीच ठेवी परत मिळतात. यामुळे सभासद, ठेवीदार, कर्जदारांचा विश्वास वाढत आहे.''